महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १० /२०२३ दि. २४/०१/२०२३

## ''वाहतुक नियंत्रण अधिसुचना''

संदर्भ :– No. Dy.CE/GC/Kopri /ROB/17/01, Date - 23/01/2023

*******

**ज्याअर्थी,** ठाणे पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात ठाणे वाहतूक विभाग अंतर्गत कोपरी वाहतूक उप विभागाच्या हद्दीत MMRDA तर्फे कोपरी रेल्वे ब्रिजवर डांबरीकरणाचे काम करण्यात येणार असून संदर्भीय पत्रान्वये १) नाशिक–मुंबई वाहिनीवर दि. २४/०१/२०२३ रोजी रात्री २३.०० ते दि. २५/०१/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा.पर्यंत २) मुंबई–नाशिक वाहिनीवर दि. २५/०१/२०२३ रोजी रात्री २३.०० ते दि. २६/०१/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. पर्यंत कोपरी रेल्वे ब्रिज वरुन नाशिक मुंबई व मुंबई नाशिक वाहिनीवरील सुरु असलेली वाहतुक पुर्णपणे बंद ठेवून पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक आहे.

**ज्याअर्थी,** ठाणे शहर अंतर्गत परिसरातुन राज्यांतर्गत व बाहेरील राज्यातुन मुंबई पुर्व द्रुतगती महामार्गाने जड अवजड व हलक्या वाहनांची मोठया प्रमाणात ये–जा होत असते. ठाणे बाजुकडुन मुंबई कडे व मुंबई बाजुकडुन ठाणेकडे जाणा–या सर्व प्रकारच्या हलक्या व जड अवजड वाहनांना प्रवेश बंद करावा लागणार आहे. त्याकरीता वाहनांची वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणे आवश्यक असल्याने व ठाणे परिसरात वाहतुक कोंडी होवू नये, वाहतुक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **डॉ. विनयकुमार राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे.

### जड–अवजड वाहनांकरीता

**प्रवेश बंद –** १) नाशिक मुंबई महामार्गाने ठाणे शहरातुन मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने मुंबईकडे जाणा–या जड–अवजड वाहनांना खारेगांव टोलनाका येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने खारेगांव टोलनाका येथुन डावीकडे वळण घेवून गॅमन चौक–पारसिक रेती बंदर–मुंब्रा बायपास–शिळफाटा उजवे वळण घेवुन महापे मार्गे–रबाळे–ऐरोली ब्रिज मार्गे मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) घोडबंदर महामार्गाने ठाणे शहरातुन मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने मुंबईकडे जाणा–या जड–अवजड वाहनांना माजीवाडा ब्रिजवर उजवे वळण घेण्यास व गोल्डन क्रॉस माजीवाडा ब्रिज खाली **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदरची वाहने तत्वज्ञान सिग्नल पुढे माजीवाडा ब्रिज वरुन खारेगांव टोलनाका येथुन डावीकडे वळण घेवून गॅमन चौक–पारसिक रेती बंदर–मुंब्रा बायपास–शिळफाटा उजवीकडे वळण घेवुन महापे मार्गे–रबाळे–ऐरोली ब्रिज मार्गे मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने इच्छित स्थळी जातील.

### हलक्या वाहनांकरीता

**प्रवेश बंद –** नाशिक व घोडबंदर रोडने तसेच ठाणे शहरातून मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने मुंबईकडे जाणा–या सर्व प्रकारच्या हलक्या वाहनांना तीन हात नाका ब्रिज येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** १) नाशिक कडुन मुंबई कडे जाणारी हलकी वाहने साकेत कट डावीकडे वळण घेवुन महालक्ष्मी मंदिर–साकेत रोड–क्रिक नाका–डावीकडे वळण घेवून–शिवाजी चौक कळवा–विटावा–ऐरोली मार्गे–ऐरोली ब्रिज–ऐरोली ब्रिज मार्गे मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** २) ठाणे शहरातुन मुंबई कडे जाणारी हलकी वाहने जी.पी.ओ.ऑफिस–ठाणे जिल्हा मध्यवर्ती कारागृह रोड–आर.टी.ओ. कार्यालय समोरुन–क्रिक नाका–कळवा ब्रिज–शिवाजी चौक कळवा–विटावा–ऐरोली मार्गे–ऐरोली ब्रिज मार्गे मुंबई पुर्व द्रुतगतीमार्गाने इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ३) घोडबंदर रोड व ठाणे शहरातुन मुंबई कडे जाणारी हलकी वाहने तीन हात नाका येथुन उजवीकडे वळण घेवुन एल.बी.एस.रोडने–मॉडेला चेकनाका मार्गे मुंबईकडे इच्छित स्थळी जातील.

**पर्यायी मार्ग –** ४) घोडबंदर रोड व ठाणे शहरातुन मुंबई कडे जाणारी हलकी वाहने तीन हात नाका–तुळजा भवानी मंदिर कट–सर्व्हिस रोडने–कोपरी ब्रिज–कोपरी सर्कल–बारा बंगला–फॉरेस्ट ऑफिस–माँ बाल निकेतन स्कुल–आनंदनगर चेक नाका मार्गे मुंबईकडे इच्छित स्थळी जातील.

सदरची वाहतूक अधिसुचना १) नाशिक–मुंबई वाहिनीवर दि. २४/०१/२०२३ रोजी रात्रौ २३.०० ते दि. २५/०१/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा.पर्यंत २) मुंबई–नाशिक वाहिनीवर दि. २५/०१/२०२३ रोजी रात्रौ २३.०० ते दि. २६/०१/२०२३ रोजी सकाळी ०६.०० वा. पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसूचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदरची अधिसुचना राजपत्रात प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. जिल्हाधिकारी, ठाणे, पालघर व रायगड जिल्हा
मा. अपर पोलीस महासंचालक, (का. व सु.) मुंबई
मा. अपर पोलीस महासंचालक, वाहतुक म. रा. मुंबई
मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, बृहन्मुंबई वाहतुक विभाग, वरळी, मुंबई
मा. विशेष पोलीस महानिरीक्षक, कोकण परिक्षेत्र, नवी मुंबई
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१ व ५, वि. शा. ठाणे

**प्रत – आवश्यक कार्यवाहीसाठी :–**

मा. पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामिण, पालघर, रायगड
मा. पोलीस अधिक्षक, रस्ता सुरक्षा महामार्ग, ठाणे.
पोलीस उप आयुक्त, वाहतुक विभाग, नवी मुंबई,

प्रत – मा. आयुक्त, ठाणे, भिवंडी निजामपुर शहर, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका.
प्रत – मुख्य व्यवस्थापक (वाहतुक), जे. एन. पी. टी. न्हावाशेवा, नवी मुंबई
प्रत – स्विय सहायक, मा. पालकमंत्री, जिल्हा–ठाणे.
प्रत – प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
प्रत – परिवहन व्यवस्थापक, ठाणे/नवी मुंबई/बृहन्मुंबई महानगरपालिका.
प्रत – विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.
प्रत – नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे
प्रत – सर्व संबंधीत वाहतुक संघटना.

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, ठाणे/भिवंडी व पो.निरी. नौपाडा, वागळे, कापुरबावडी, कासारवडवली, कळवा, कोपरी, मुंब्रा, नारपोली वाहतूक उपविभाग ठाणे.